“महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणाचा अभ्यास.”

एम. जी. एम. विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आंतर विद्याशाखेअंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी सादर केलेला अंतिम गोषवारा

गोषवारा

-:संशोधक:-

संदीप उत्तम चोपडे

-:मार्गदर्शक:-

डॉ. रसिका आर. वडाळकर

ग्रंथपाल, सहाय्यक प्राध्यापक

डॉ. जी. वाय. पाथ्रीकर कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स ॲण्ड इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी,

ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग,

एम. जी. एम. विद्यापीठ,

छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र.

ऑगस्ट २०२५

अनुक्रमणिका

अ. क्र	तपशिल	पृ. क्र.
	संशोधनाचे शिर्षक	१
१	प्रस्तावना	१
२	मूलभुत संकल्पना	२
२.१	ग्रंथालय	२
२.२	वाचनसाहित्यसंग्रह विकास	३
२.३	आयुर्वेद	४
२.४	महाविद्यालय ग्रंथालये	५
२.५	ग्रंथालय व वाचनसाहित्यसंग्रह विकास	५
२.६	वाचनसाहित्य संग्रह विकासाचा उद्देश	६
३	संशोधन समस्या	७
४	संशोधनाची उद्दिष्टे	७
५	संशोधणाचे गृहितके	७
६	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	८
७	संशोधनाची आवश्यकता	९
८	संशोधन पध्दती	१०
८.१	ऐतिहासीक संशोधन पद्धती	१२
८.२	प्रायोगिक संशोधन पध्दती	१३
८.३	वर्णनात्मक संशोधन पध्दती	१४
८.४	सर्वेक्षण पध्दती	१५
९	तथ्य संकलनाची साधने	१६
९.१	तथ्य संकलन	१६

९.२	प्राथमिक स्त्रोत	१७
९.३	प्रश्नावली	१८
९.४	दुय्यम स्त्रोत	२०
१०	माहिती संकलन, विश्लेषण	२०
११	संशोधन प्रकरण योजना	२२
१२.	संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष	२४
१३	उद्दिष्टांची पूर्तता	४०
१४	गृहितकांची पडताळणी	४४
१५	शिफारशी	५१
१६	पुढील संशोधनासाठी दिशा	५३
१७	समारोप	५४
१८	संदर्भसूची	५५

“महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणाचा अभ्यास.”

१. प्रस्तावना

शिक्षणाला मानवी जीवनामध्ये खूप महत्व आहे. शिक्षण म्हणजे मानवाला स्वावलंबी व निःस्वार्थी बनविण्याची एक प्रक्रिया आहे, असे ऋग्वेदामध्ये सांगितले आहे. शिक्षणाबरोबर शैक्षणिक ग्रंथालयाला सुध्दा अनन्य-साधारण महत्व आहे. शैक्षणिक क्षेत्रातील संशोधक वाचकांच्या ज्ञानाची गरज कशी पूर्ण करता येईल, त्या दृष्टिकोनातून ग्रंथालयातील साहित्य संग्रह कशा प्रकारे वाढवता येईल व त्याचे व्यवस्थापन कसे करता येईल, हा उद्देश कोणत्याही शैक्षणिक संस्थेतील ग्रंथालयाचा असतो. वाचकांना उपयुक्त सेवा प्रदान करून ज्ञान संवर्धन करण्यास मदत करण्याची महत्वपूर्ण जबाबदारी ग्रंथालयाद्वारे शैक्षणिक उपक्रमामध्ये पार पाडताना दिसून येते (Kaur and Gour, २०१७).

ग्रंथालयामध्ये ‘वाचनसाहित्य संग्रह विकास’ ही एक महत्वपूर्ण अशी प्रक्रिया आहे. विविध कौशल्ये प्राप्त करण्यासाठी आणि व्यक्तिमत्वाचा विकास होण्याच्या प्रक्रियेतील शैक्षणिक ग्रंथालयाचे महत्व लक्षात घेता डॉ. रंगनाथन असे म्हणतात की, शैक्षणिक ग्रंथालय हे कोणत्याही शैक्षणिक संस्थेचे हृदय आहे. जसे हृदय जीवनामध्ये शरीर निरोगी व जिवंत ठेवण्यास मदत करते त्याप्रमाणे शैक्षणिक ग्रंथालये ही शैक्षणिक वातावरण सुदृढ ठेवण्यास मदत करतात.

समाजामध्ये इतर शिक्षणाबरोबर आरोग्य शिक्षणालाही अनन्य साधारण महत्व आहे. वैद्यकीय शिक्षणामध्ये आयुर्वेद, होमिओपॅथी, ॲलोपॅथी इ. अनेक वेगवेगळ्या शिक्षण पध्दती आहेत. वैद्यकीय शिक्षणाद्वारे उत्कृष्ट वैद्य घडविणे हा एक महत्वाचा उद्देश असतो. ॲलोपॅथी शिक्षणाबरोबरच आयुर्वेद, होमिओपॅथी इ. शिक्षणही सध्या प्रगतीपथावर असल्याचे दिसून येते. म्हणूनच आयुर्वेद महाविद्यालयातील अद्ययावत ग्रंथ, नियतकालिके, वाचनसाहित्याची उपलब्धता इ. करणे व संशोधन कार्यास मदत करण्याच्या दृष्टिकोनातून ग्रंथालयाची भूमिका महत्वाची आहे. ग्रंथालयाची भूमिका लक्षात घेता ग्रंथालयाची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी 'वाचनसाहित्य विकास धोरणाची' आवश्यकता असते (जाधव, २०१२).

२. मूलभुत संकल्पना

प्रस्तूत अध्ययनामध्ये काही मूलभुत संकल्पनांचा वापर करण्यात आला आहे. त्या खालील प्रमाणे आहेत.

२.१. ग्रंथालय

ग्रंथालय म्हणजे ज्या ईमारतीत किंवा खोलीत ग्रंथ संग्रह करून ठेवलेला किंवा परंपरेने चालत आलेले वाचन किंवा अभ्यासासाठी वापरल्या जाणा-या पुस्तकांचा संग्रह असतो (ब्रिटानीका, २०२३).

महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार (२०१७)

"Knowledge Resource Centre" means a library established by the university on the campus or sub-campuses of the university to hold in print, electronic

and audio-video format material, monographs, reference volumes, text and review books, all types of journals and any other material in various format useful for education, research, extension services or for similar purposes".

ग्रंथालय म्हणजे एखाद्या विद्यापीठाने किंवा एखाद्या संस्थेने स्थापीत केलेल्या त्यामध्ये मुद्रित-अमुद्रित, ई-वाचन साहित्य दृक-श्राव्य साधने, हस्तलिखीते, संदर्भग्रंथ, वेगवेगळ्या प्रकारची मासिके इतर संग्रहीत शैक्षणिक संशोधनात्मक साहित्य असलेले निश्चित ठिकाण किंवा ईमारत होय.

डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या मते

'A library is a public institution or establishment charged with the care of collection of books and the duty of making them accessible to those who require to use them'.

२.२. वाचनसाहित्यसंग्रह विकास

वाचनसाहित्यसंग्रह विकास ही व्यवस्थित नियोजन करुन ग्रंथालयातील साहित्य संग्रहाच्या विकासासाठी राबवलेली एक प्रक्रिया आहे (Khayal,२०१३); वाचन साहित्य संग्रहाच्या माध्यमातून अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाची गरज पूर्ण करण्यासाठी आणि वाचन साहित्याची निवड, दाखल नोंदी, मुल्यमापन व वाचन साहित्याचा संग्रह त्यांच्या गरजेनुसार विकसीत करण्याचा प्रयत्न शैक्षणिक ग्रंथालयाच्या माध्यमातून केला जातो (Kaur and Gour, २०१७); वाचक हे ग्रंथालयातील साहित्याचे योग्य मुल्यमापन

करतात. कारण त्यांनाच माहित असते की, ग्रंथालयातील वाचन साहित्य हे कोणत्या पातळीपर्यंत उपयुक्त आहेत, कोणते साहित्य उपलब्ध आहे आणि कोणते साहित्य नाही. त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्थांमधील अभ्यासक, विद्यार्थी व अध्यापक हे त्या शैक्षणिक संस्थेच्या ग्रंथालयातील वाचन साहित्याच्या गुणवत्ते बाबत संयुक्तिक विधान करु शकतात. कारण ते पूर्णपणे त्या ग्रंथालयाशी समरस झालेले असतात (Patel, २०१६); ग्रंथालयाची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी वाचन साहित्य विकास धोरण राबविणे आवश्यक आहे. विशिष्ट ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रहाचा विकास करण्यासाठी निश्चित केलेला कृती कार्यक्रम म्हणजेव वाचन साहित्य संग्रह विकास धोरण होय. या धोरणाला गंथालयात निश्चित केलेल्या समितीने मान्यता व मार्गदर्शक ठरण्यासाठी त्याला लिखित स्वरूपा ठेवणे आवश्यक असते.

२.३. आयुर्वेद

आयुर्वेद या शब्दात आयु म्हणजे जीवन, वेद म्हणजे ज्ञान किंवा विद्या होय, जीवनाचे सर्वांगीण ज्ञान करून देणारे शास्त्र म्हणजे आयुर्वेद होय. हे केवळ वैद्यकशास्त्र नसून ते जीवनशास्त्र आहे. ही एक जीवनविद्या आहे. म्हणजेच ज्याच्यामुळे आयुष्याचे ज्ञान प्राप्त करून घेता येते तो आयुर्वेद होय. (आयुर्वेद, २०२३).

आयुर्वेद हा संस्कृत भाषेतील शब्द असून त्याचा संधिविग्रह आयुर्वेद म्हणजेच जीवनविद्या असा होतो (जोशी, १९७६).

आयुर्वेद हे भारताचे वैशिष्ट्यपूर्ण असे वैद्यकशास्त्र असून ते अतिप्राचीन असे वैद्यकशास्त्र होय, आयुर्वेद म्हणजे आयुष्याचे ज्ञान देणारे शास्त्र आहे (परांजपे, १९८५).

२.४. महाविद्यालय ग्रंथालये

"महाविद्यालयीन ग्रंथालय ही महाविद्यालय किंवा उच्च शिक्षण संस्थेतील एक समर्पित सुविधा केंद्र आहे. ज्यामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचा-यांच्या शैक्षणिक आणि संशोधनात्मक गरजा पूर्ण करण्यासाठी विस्तृत स्वरुपात माहिती संसाधने आणि सेवा प्रदान करते. ज्यामध्ये सामान्यतः भौतिक संसाधनाव्यतिरिक्त, ग्रंथ, मासिके, ई- संसाधने, संशोधनात्मक डेटाबेस आणि इतर शैक्षणिक साहित्यांचा संग्रह असतो, त्याचप्रमाणे प्रशिक्षित ग्रंथपालांकडून ज्ञान मिळविण्यासाठी मदत आणि अभ्यासासाठी व्यवस्थित जागेचा समावेश होतो" (Wikipedia, २०२५).

२.५. ग्रंथालय व वाचनसाहित्य संग्रह विकास

'वाचनसाहित्य संग्रह विकास' ही व्यवस्थित नियोजन करुन ग्रंथालयातील साहित्य संग्रहाच्या विकासासाठी राबवलेली एक प्रक्रिया आहे (Khayal, २०१३). वाचन साहित्य संग्रहाच्या माध्यमातून अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाची गरज पूर्ण करण्यासाठी आणि वाचन साहित्याची निवड, दाखल नोंदी, मूल्यमापन व वाचन साहित्याचा संग्रह त्याच्या गरजेनुसार बनवण्याचा प्रयत्न शैक्षणिक ग्रंथालयाच्या माध्यमातून केला जातो (Kaur and Gour, २०१७). वाचक हे ग्रंथालयातील साहित्याचे योग्य मूल्यमापन करतात. कारण त्यांनाच माहित असते की, ग्रंथालयातील वाचन साहित्य हे कोणत्या

पातळीपर्यंत उपयुक्त आहे. कोणते साहित्य उपलब्ध आहे किंवा कोणते साहित्य उपलब्ध नाही. म्हणजेच वाचकच ख-या अर्थाने वाचनसहित्य ज्ञानाच्या गरजा पूर्ण करते किंवा नाही, हे सांगू शकतात. त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्थामधील अभ्यासक, विद्यार्थी व अध्यापक हे त्या शैक्षणिक संस्थेच्या ग्रंथालयातील वाचन साहित्याच्या गुणवत्ते-बाबत संयुक्तिक विधान करु शकतात. कारण ते पूर्णपणे त्या ग्रंथालयाशी जोडले गेलेले असतात (Patel, २०१६). ग्रंथालयाची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी ‘वाचनसाहित्य विकास धोरण’ राबविणे आवश्यक आहे. विशिष्ट ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रहाचा विकास करण्यासाठी निश्चित केलेला कृती कार्यक्रम म्हणजे ‘वाचनसाहित्य संग्रह विकास धोरण’ होय. या धोरणाला ग्रंथालयात निश्चित केलेल्या समितीने मान्यता व मार्गदर्शक ठरण्यासाठी त्याला लिखित स्वरूपात ठेवणे आवश्यक असते.

२.६. वाचनसाहित्य संग्रह विकासाचा उद्देश

ग्रंथालयातील वाचनसाहित्य विकास ही एक गतिशील व सतत सुरु असणारी प्रक्रिया आहे. यामध्ये प्रामुख्याने वाचक, ग्रंथालय कर्मचारी वर्ग, विषयतज्ज्ञांचा ग्रंथ निवडीती सहभाग इत्यादी बाबींचा समावेश होतो. ग्रंथालयातील ग्रंथ संग्रह विकासामध्ये वाचकांच्या गरजेवर, अद्ययावत ज्ञान आणि ग्रंथालयातील ग्रंथ आणि वाचकांच्या ज्ञानाची किंवा ज्ञानाच्या गरजांचा समतोलही समाविष्ट आहे (Gopinath and Rao, १९८२).

३. संशोधन समस्या

"महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणाचा अभ्यास."

४. संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित केली आहेत, ती खालील प्रमाणे आहेत.

१) महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या सद्यःस्थितीचा आढावा घेणे.

२) आयुर्वेद शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.

३) आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील मुद्रित व अमुद्रित वाचनसाहित्य संग्रह विकासाचा अभ्यास करणे.

४) आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या वाचनसाहित्यसंग्रह विकासासाठी उपलब्ध असणा-या धोरणाचा अभ्यास करणे.

५) महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या वाचनसाहित्यसंग्रह विकासात ग्रंथालय समितीची भूमिका जाणून घेणे.

५. संशोधणाची गृहितके

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितके निश्चत करण्यात आली आहेत.

१. महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांची सद्यःस्थिती समाधानकारक आहे.

२. आयुर्वेद शिक्षणाची सुरुवात प्राचीन काळापासून झालेली असून त्यामध्ये झपाट्याने विकास झाल्याचे दिसून येते.

३. महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील मुद्रित व अमुद्रित वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरण लिखित स्वरुपात करण्याची आवश्यकता आहे.

४. आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

५. महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालय वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणात ग्रंथालय समितीची महत्वपूर्ण भूमिका दिसून येते.

६. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

कोणतेही कार्य करीत असतांना काही मर्यादा ठरवलेल्या असतात. प्रस्तुत संशोधनासाठी समग्राच्या प्रमाणात संशोधनाची व्याप्ती मर्यादा ठरविणे कठिण कार्य आहे. सदर संशोधनाच्या अध्ययनामध्ये अभ्यासकाने नमूद केलेले उद्दिष्टे व गृहितकांना आधार मानून संबंधित समग्राचा विचार करण्यात आला आहे. त्यामुळे प्रस्तूत संशोधन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य हे केवळ भारत देशामध्येच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये आरोग्य विषक बाबीसाठी अग्रगण्य राज्य आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी सन २०२२ पर्यंत सलग्न विभागवार आयुर्वेद महाविद्यालयाची एकूण संख्या ७८ असून संशोधकाने महाराष्ट्र राज्य संशोधनासाठी समग्र मानून महाराष्ट्रातील एकूण ७८ आयुर्वेद महाविद्यालय संशोधन क्षेत्र मर्यादित केले आहे.

तक्ता क्र. १

महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांची प्रशासकीय विभागनिहाय संख्या दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	प्रशासकीय विभाग	आयुर्वेद महाविद्यालयाची संख्या
१	मुंबई	८
२	पुणे	२२
३	नाशिक	१७
४	छत्रपती संभाजीनगर	११
५	नागपूर	९
६	आमरावती	११
एकूण		**७८**

७. संशोधनाची आवश्यकता

वाचनसाहित्यसंग्रह ही एक ग्रंथालय व्यवस्थापनातील महत्वपूर्ण प्रक्रिया आहे. ग्रंथालयामध्ये वाचनसाहित्यसंग्रहाच्या माध्यमातून वाचकांच्या अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाची गरज पूर्ण करण्यासाठी आणि वाचन साहित्याची निवड, संग्रह, दाखल नोंदी व साहित्याचे मूल्यमापन वाचकांच्या माध्यमातून केले जाते. त्यामुळे वाचकांच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यासाठी वाचकांच्या गरजा आणि ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह यामध्ये ताळमेळ साधणे आवश्यक ठरते. त्यासाठी ग्रंथालय ज्या उद्देशाने स्थापित झालेले असते त्या गरजा पूर्ण करण्यासाठी वाचकांनी सुचविलेल्या सूचना किंवा शिफारसी ग्रंथसंग्रह विकास करीत असतांना विचारात घेणे आवश्यक असते. ग्रंथसंग्रह, ग्रंथालय व्यवस्थापन हे ग्रंथालयातील लक्षणीय व सर्वाधिक समस्याप्रधान कार्य आहे. त्यामुळे

ग्रंथसंग्रह विकासाचे नियोजन करीत असतांना, त्याबाबत निर्णय घेणे तसेच अर्थसंकल्प तयार करीत असताना त्याबाबत व्यवस्थित मांडणी करणे आवश्यक असते, ग्रंथालय विकाससाठी ग्रंथालय उद्दिष्ट्ये पुर्णत्वास नेण्यासाठी तसेच ग्रंथालयाची भुमिका लक्षात घेता ग्रंथसंगह विकास करण्यासाठी विशिष्ट धोरण आवश्यक आहे, या सर्व बाबी लक्षात घेऊन संशोधकाने प्रस्तूत विषयाची निवड केली आहे (कुमार आणि गौर, २०१८).

८. संशोधन पध्दती

संशोधन हे प्राथमिक व दितीय स्त्रोतावर अवलंबून असते. जे डब्ल्यु. बेस्ट यांच्या मतानुसार 'संशोधन ही अशी अधिक व्यवस्थित क्रियात्मकता आहे की, जी नव्याचा शोध घेते व संघटित ज्ञानाला अधिक विकसित करते.'

संशोधकाचा दृष्टिकोन, उद्देश वा संशोधनाच्या स्वरूपाच्या आधारावर संशोधनाचे प्रमुख दोन प्रकार आहेत, आहेत. त्यामध्ये मौलिक, शुध्द किंवा सैध्दांतिक संशोधन व व्यावहारिक संशोधनाचा समावेश होतो. या दोन प्रकाराशिवाय क्रियात्मक संशोधन हा तिसरा प्रकारही प्रचलित आहे (आगलावे, २०००). प्रस्तूत संशोधन कार्य करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

माणसाला प्रगतीकडे नेण्यासाठी संशोधन हे एक आवश्यक आणि शक्तिशाली साधन आहे. पध्दतशीर संशोधनाशिवाय फारच कमी प्रगती झाली असती. मानवाच्या विकासाचे रहस्य हे संशोधन आहे. अज्ञानाच्या क्षेत्रांना मागे टाकुन नवीन सत्ये शोधून काढण्याचा

पध्दतशीर उत्तम मार्ग म्हणजे संशोधन होय. वैज्ञानिक संशोधनामुळे व्यक्तीच्या जीवनाच्या काही क्षेत्रात प्रगती होते. सामाजिक, भौतिक व जैविक जीवनात सतत होत असलेल्या संशोधनामुळे नवनवीन तथ्ये, नवनवीन संकल्पना व नविन गोष्ट करण्याच्या मार्ग सापडत आहेत. त्यामुळे संशोधनाने प्रयोगशाळांच्या मर्यादा तोडलेल्या आहेत. संशोधन ही एक बौध्दिक प्रक्रिया आहे. त्यामुळे नविन ज्ञान प्रकाशात आणण्यास मदत होते. विद्यमान चुका दूर करुन त्यामध्ये नवीन भर घालण्याचे महत्वपुर्ण कार्य ही संशोधनाच्या माध्यमातून होताना दिसुन येते.

जे. फ्रांसिस रूमेल यांच्या मतानुसार संशोधन हे ज्ञान शोधण्याचा आणि पडताळनी करण्याची बौध्दिक प्रक्रिया आहे. जी शेकडो वर्षामध्ये सतत घडत व तिच्या स्वरुपात बदलून नियमित सत्याचा शोध घेण्याचा प्रक्रिया आहे.

पी. एम. कूक यांच्या मतानुसार संशोधन हे एखाद्या दिलेल्या समस्येसंदर्भात प्रामाणिक, संपुर्ण व बौध्दिक प्रक्रिया आहे. जी त्या समस्ये संदर्भात निघालेल्या निष्कर्ष हे अभ्यासलेल्या क्षेत्रातील एक प्रामाणिक व पडताळणी योग्य योगदान आहे.

जे डब्ल्यु. बेस्ट यांच्यामतानूसार संशोधन ही अशी अधिक व्यवस्थित क्रियात्मकता आहे की, जी नव्याचा शोध घेते व संघटित ज्ञानाला अधिक विकसित करते.

वरिल व्याख्यावरून असे लक्षात येते की, संशोधन ही नवीन तथ्यांचा शोध घेण्यासाठी काळजीपुर्वक केलेले अन्वेषन किंवा परीक्षण हेच संशोधन होय.

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधकाने पुढील कार्यपद्धतीचा अवलंब केलेला आहे. संशोधनाची उद्दिष्टे, माहिती संकलनाचे तंत्रे, साधने, क्षेत्र नियंत्रण तंत्र इत्यादी अनेक प्रकारच्या आधारावर शैक्षणिक संशोधन पद्धतीचे चार प्रकारात विभाजन करता येते.

१. ऐतिहासीक संशोधन पद्धती

२. प्रायोगिक संशेधन पद्धती

३. वर्णनात्मक संशोधन पध्दती

४.सर्वेक्षण संशोधन पद्धती

८.१. ऐतिहासीक संशोधन पद्धती

ऐतिहासिक संशोधन पध्दती ही परंपरागत चालत आलेल्या प्राचीन पध्दतीपेकी एक संशोधन पध्दती आहे. या पध्दतीद्वारे भुतकाळात घडुन गेलेल्या घटनांचा क्रंमबध्द पध्दतीने, प्रमाणित व व्यवस्थित स्वरूपात अध्ययन करता येतात. इतिहास म्हणजे बदलत्या प्रक्रियांची नोंद असते. इतिहासामध्ये सामाजिक संरचनामध्ये होणा-या बदलांचा वा घडणा-या घटनांचा समावेश होतो. माणसाच्या कर्तृत्वाचा कालानुक्रमाने घडणा-या घटनाच्या वैशिष्ट्यांची यादीच असते.

जॉन डब्ल्यू बेस्ट यांच्यामते माणूस भूतकाळ समजून घेण्यासाठी इतिहासाचा वापर करतो आणि भूतकाळातील घटना आणि घडामोडींच्या प्रकाशात वर्तमान समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

रेडक्लिप ब्राऊन यांच्यामते ऐतिहासिक पध्दतीची व्याख्या करताना म्हणतात की, ही एक अशी पध्दती आहे ज्यामध्ये

भूतकाळात घडलेल्या घटनांच्या संदर्भात सध्याच्या घटनांचा अभ्यास केला जातो.

ऐतिहासिक पध्दतीचे महत्व सांगत असताना पी व्ही यंग म्हणतात की, भूतकाळात सामाजिक शक्ती व प्रभावांनी रूपांतरण घडवित वर्तमानाला जो आकृतिबंध दिला, त्यास कारणीभूत ठरलेल्या नियमांचा शोध घेण्यासाठी इतिहासात्मक संशोधन पध्दती उपयोग केला जातो, भूत आणि चालू काळातील घटनाचा वैचारिक व तार्किक संगतीचा त्याचप्रमाणे त्यांचा अनूक्रम निश्चित करण्याचे कार्य केले जाते (क-हाडे, २०११). ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या अभ्यासामध्ये ग्रंथालयामध्ये वापरण्यात आलेल्या व दिल्या जाणा-या सेवांचा ऐतिहासीक आढावा घेण्यासाठी, ग्रंथालयच्या संगणकीकरण प्रणालीच्या उपयोगाचा व डिजीटल माध्यमाच्या आणि डिजीटाइझेन करण्यासाठी वापरण्यात येण्या-या प्रक्रियेचा, ग्रंथालयाच्या स्त्रोतांचा विकासाचा, ग्रंथ विकास धोरणाचा आदी बाबींचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासीक संशोधन पध्दतीचा उपयोग करता येतो.

८.२. प्रायोगिक संशोधन पध्दती

ही एक वैज्ञानिक पध्दत असून प्रायोगिक संशोधन पध्दतीमध्ये प्रामुख्याने नियंत्रित व आनियंत्रित घटाकांच्या परिणामाचा निरीक्षण ठेवून परीक्षण केले जाते. परिक्षण केलेल्या घटावरिल परिणामाधील घटकांचे तुलनात्मक अध्ययन केले जाते. म्हणजे ही नियंत्रित परिस्थितीत निरीक्षणासारखे आहे. हे एकल व्हेरिएबल आणि कारणीभूत घटकांच्या प्रतिक्रियेवर कार्य करते. यामध्ये कारण आणि परिणामाच्या संबंधांचा अभ्यास केला जातो. सामाजिक शास्त्राच्या व

नैसर्गिक शास्त्रांच्या अध्ययनासाठी या पध्दतीचा प्रामुख्याने उपयोग होतो.

८.३. वर्णनात्मक संशोधन पध्दती

वर्णनात्मक संशोधनात सद्यःस्थिती काय आहे याचे वर्णन व अर्थनिर्वाचन करताना कोणती स्थिती किंवा संबंध अस्तित्वात आहेत, कोणकोणती मते आहेत, कोणकोणत्या प्रक्रिया चालू आहेत, कोणते परिणाम वा कोणकोणत्या प्रवृती दिसून येतात, हे संशोधन मूलतः वर्तमानकाळाशी संबंधीत आहे, तथापि भूतकाळातील घटना व त्या घटनांचा ब-याचवेळा विचार केला जातो. कारण त्या सद्यःस्थितीशी सबंधित असतात.

वर्णनात्मक संशोधन पध्दती ही सर्व संशोधन पध्दतींमध्ये अत्यंत लोकप्रिय पध्दती असून या पध्दतीचा सर्वात मोठ्या प्रमाणावर ग्रंथालयीन संशोधन व समस्या सोडविण्यासाठी वापर केला जातो. त्याचप्रमाणे विविध घटनांच्या संदर्भात जशी संख्यात्मक माहिती गोळा केली जाते, तशी गुणात्मक माहितीही गोळा केली जाते. त्यामुळे संबंधित विषयक्षेत्रात ज्ञानवृध्दी होत असते.

वर्णनात्मक संशोधनाचे विविध प्रकार खालील प्रमाणे आहेत.

१. सर्वेक्षण
२. व्यष्टी अभ्यास
३. तौलनिक कार्यकारण पध्दती
४. सहसंबंध व पूर्वानुमान पध्दती
५. दस्तावेज पृथःक्करण

संशोधनाची उद्दिष्टे, माहिती संकलनाची तंत्रे, साधने, क्षेत्र नियंत्रण तंत्र इत्यादी अनेक प्रकारच्या संशोधन आधारीत असते. प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधकाने सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

८.४. सर्वेक्षण पध्दती

सर्वेक्षण म्हणजे प्रचलित तथ्यांचे संकलन, वर्णन, स्पष्टीकरण आणि मूल्यमापन होय. सर्वेक्षणात निवडक माहिती संकलित करणे आणि पत्रके तयार करणे एवढ्या पुरते ते मर्यादीत असत नाही तर त्यामध्ये मापन, वर्गीकरण,अर्थनिर्वाचन आणि मूल्यांकन इ. बाबींचा समावेश होतो. तसेच या पद्धतीतून संशोधनात सद्यस्थिती काय आहे, कोणती मते आहेत, कोणत्या प्रक्रिया चालू आहेत, कोणते परिणाम दिसून येतात, कोणत्या प्रवृती दिसून येतात या सर्व बाबींचा विचार सर्वेक्षण पद्धतीत केला आहे.

सर्वेक्षण म्हणजे कोणत्याही वस्तू किंवा घटनेचे निरीक्षण व परीक्षण करणे होय. जरी हे निरीक्षण-परीक्षण सामाजिक जीवन किंवा सामाजिक घटनांशी संबधित असेल तर ढोबळमानाने त्यास सामाजिक सर्वेक्षण म्हटले जाते. त्याचप्रमाणे ग्रंथालयामध्ये नियमित वाचक भेट देत असतो. वाचकांचा व ग्रंथपालाचा वाचन साहित्या बाबत वा ग्रंथालयातील ग्रंथालयाच्या माध्यमातून पुरविल्या जाणा-या विविध सेवा व सुविधाच्या माध्यमातून वाचक व ग्रंथपाल यांच्यामध्ये नियमित संबंध प्रस्थापित होत असतात. त्यांचे समाधान व ग्रंथालय विकासासाठी वाचकांचे सर्वेक्षण केले जाते.

९. तथ्य संकलनाची साधने

संशोधकाने संशोधनासाठी जो विषय निश्चित केलेला असतो. त्या विषयासंबंधी विविध स्वरूपाची माहिती संकलित करावी लागते. ती माहिती संकलनासाठी संशोधकाला विविध साधने वापरावी लागतात. सर्वच साधने माहिती संकलनासाठी उपयुक्त नसतात मात्र या अनेक साधनामधून संशोधकास योग्य साधनाची निवड करावी लागते. प्रस्तूत संशोधनासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीच्या सहेतूक किंवा उद्देशपूर्ण नमूना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला आहे (क-हाडे, २०११). त्या दृष्टीने संशोधकास या साधनांचा परिचय, त्यांचे महत्व, उपयुक्तता तसेच त्याचे गुण-दोष याची यथार्थ माहिती असणे आवश्यक आहे.

९.१. तथ्य संकलन

संशोधन प्रक्रियेत तथ्यांच्या संकलनासाठी संशोधनाचे समग्र आणि त्यांच्यातील एककांना लक्षात घेऊन तथ्य संकलन संबंधीचा विचार करण्यात आला आहे. सामाजिक शास्त्रामध्ये तथ्य सर्व सामान्यतः व्यक्तिंच्या व उत्तरदात्यांना विचारलेल्या प्रश्नांच्या प्रतिक्रिया नोंदविण्याच्या स्वरूपात असतात. हे लक्षात घेवून प्रस्तुत अभ्यास विषयाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केलेला आहे.

माहिती संकलनाची दोन साधने आहेत.

१. प्राथमिक स्त्रोत

२. दुय्यम स्त्रोत

या द्वारे संशोधक हा संशोधनासाठी लागणारी माहिती संकलित करत असतो.

९.२. प्राथमिक स्त्रोत

संशोधकाने आयुर्वेदिक माहाविद्यालय ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणाचा अभ्यास करत असतांना प्रश्नावली या पद्धतीचा तथ्यसंकलनासाठी उपयोग केला आहे. प्रश्नावली तयार करताना संशोधनातील उद्दिष्ट्ये केंद्रस्थानी मानून प्रश्नावली बंदिस्त प्रश्नांचा समावेश केला असून अपवादात्मक स्वरूपात काही मुक्त प्रश्नांचादेखील समावेश केलेला आहे. निवडलेल्या उत्तरदात्यांच्या प्रश्नावली द्वारे घेऊन विषयासंबंधीची विविध माहिती संकलित करण्याचा प्राथमिक पद्धतीवर प्रामुख्याने भर देण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधनात प्रश्नावली या तंत्राचा वापर करण्यात आला आहे. या अंतर्गत संशोधनात्मक, व्यक्तिगत, नियंत्रित, अनियंत्रित तसेच सखोल प्रश्नांच्या आधारे माहिती घेण्यात आली. उद्देशानुसार निवडलेल्या आर्युवेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांतील राबविण्यात येत असलेल्या 'ग्रंथसंग्रहविकास धोरणाचा' अभ्यास करत असताना ग्रंथपाल यांच्या बरोबर चर्चा करून माहिती संकलित केली आहे. ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह करताना येणा-या अडचणी बदल व्यापक प्रमाणात धोरण ठरविण्याची गरज यावर चर्चा केली. त्याचबरोबर त्यांच्या अनुभवाचा देखील संशोधकाला संशोधन कार्यात मोठा फायदा झालेला आहे.

९.३. प्रश्नावली

गुड आणि हॅट यांच्या मतानुसार प्रश्नावली म्हणजे ‘‘सामान्यरूपात प्रश्नांची उत्तरे प्राप्त करून घेण्याची पध्दत असून तिच्यात प्रश्नप्रत्रिकेचा उपयोग केला जातो. आणि जी उत्तरदाता स्वतः भरून देतो.’’ (आगलावे, २०००).

प्रश्नांचे उद्दिष्टानुसार व्यवस्थित संकलन केलेल्या प्रश्नांची यादी किंवा प्रश्नांची तालिका असते. उत्तरदात्याला प्रश्नावलीत दिलल्या प्रश्नांची उत्तरे ही प्रतिसादाद्वारे द्यावी लागतात. प्रश्नावली पध्दत साधारणतः वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये वापरली जाते. ग्रंथालय व माहितीशास्त्रात वाचकांच्या आवडी निवडी व माहितीविषयक गरजा जाणून घेण्यासाठी या पध्दतीचा उपयोग केला जातो.

प्रश्नावलीची रचना, प्रश्नांचे स्वरुप आणि तथ्यांचे स्वरूप या आधारवर प्रश्नावलीचे विविध प्रकार पडतात.

श्रीमती पॉलिन यंग यांच्या मतानुसार मुख्यतः प्रश्नावलीचे दोन प्रकार पडतात. ते खालील प्रमाणे.

१) संरचित प्रश्नावली

२) असंरचित प्रश्नावली

प्रश्नावलीच्या स्वरुपाच्या आधानुसार प्रश्नावलीचे विविध प्रकार पडतात.

१) बंदिस्त प्रश्नावली

२) मुक्त प्रश्नावली

३) चित्रमय प्रश्नावली

४) मिश्रित प्रश्नावली

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावलीची रचना करीत असताना बंदिस्त व मुक्त स्वरुपाचे प्रश्न असलेले प्रश्नांचा समावेश असलेली प्रश्नावली तयार करण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधन करण्यासाठी उद्दिष्टे व गृहितके नुसार प्रश्नावलीची रचना करीत असताना खालील घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

क) ग्रंथालयातील ग्रंथ संग्रहविषयी सर्वसाधारण सद्यस्थिती

ख) ग्रंथोपार्जन धोरणाविषयी माहिती

ग) ग्रंथालयातील ग्रंथ खरेदी विषयी माहिती

घ) ग्रंथालयातील समिती विषयी माहिती

च) ग्रंथालयातील सेवा विषयी माहिती

छ) ग्रंथालयातील संगणकीकरण विषयी माहिती

ज) ग्रंथालयातील ग्रंथ रद्दबातल धोरणाविषयी माहिती

झ) ग्रंथालयातील सेवक धोरणाविषयी माहिती

ट) ग्रंथालय वेळे विषयी माहिती

ठ) ग्रंथालयाच्या नियतकालीकाविषयी माहिती

ड) ग्रंथालय इमारती विषयी माहिती

ढ) ग्रंथालय अंदाजपत्रकाविषयी माहिती

ण) ग्रंथालयीन सुरक्षिततते विषयी माहिती

९.४ दुय्यम स्त्रोत

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक तथ्यांना अधिक विश्वसनीय व प्रमाणित करण्यासाठी जे काही उपलब्ध प्रकाशित व अप्रकाशित साहित्य आहे. उदा. शासकीय, दस्तावेज, जनगणना अहवाल, जिल्हा माहिती, गॅझीटीअर, शासकीय अहवाल, रिपोर्ट तसेच वेगवेगळ्या संशोधन पत्रिका, पुस्तके, ग्रंथसूची, विश्वकोष प्रकाशित अप्रकाशित शोध प्रबंध, शोध निबंध, अहवाल यांच्या नोंदी, मासिके, वर्तमानपत्रे इ. सर्व अध्ययनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरलेले आहे.

१०. माहिती संकलन, विश्लेषण

संशोधनात घटनांचे वैज्ञानिक पध्दतीद्वारे अध्ययन केले जाते. म्हणजेच घटनाच्या अध्ययनामध्ये वैज्ञानिक पध्दती उपयोगात आणून वस्तुनिष्ठ पध्दतीने संशोधन करण्यात येते. वैज्ञानिक पध्दती ही नियमांचा शोध घेण्याच्या उद्देशाने उपयोगात आणल्या गेलेल्या तंत्रांची एक व्यवस्था आहे. सत्याचा शोध हा कल्पनेच्या आधारावर शक्य नसतो. त्याकरिता त्या घटनेच्या संबंधित वास्तविक तथ्यांचे संकलन करणे अतिशय महत्वाचे आहे. कारण त्याशिवाय वर्गीकरण आणि अध्ययन विषयाच्या संबंधित संकल्पनाची निर्मिती करणे आवश्यक असते. या योग्य संकल्पनाच्या आधारावर सिध्दांताची निर्मिती केली जाते. त्यामुळे तथ्ये व संकल्पनांच्या आधारावरच सिध्दांतांची मांडणी करता येणे शक्य होते. म्हणून तथ्यांचे शास्त्रीय पध्दतीने संकलन करणे आवश्यक आहे. त्या निरनिराळ्या संकलन तंत्राद्वारे संकलन

तथ्य केल्यानंतर समोरची संशोधनातील महत्वाची पायरी म्हणजे माहितीचे विश्लेषण व निर्वचन होय. संशोधनासाठी संकलित केलेल्या तथ्यावर व आकडेवारीवर प्रक्रिया करणे आवश्यक असते. त्या शिवाय ती योग्य पध्दतीने हाताळता येऊ शकत नाही. त्या तथ्यावरच किंवा आकडेवारीवर सांख्यिकीय प्रक्रिया करून त्यातून अर्थपूर्ण तथ्यांची निर्मिती केली जाते. त्यातून सिध्दांताचे प्रतिपादन करणे सुलभ जाते.

माहितीचे विश्लेषण केल्यानंतर त्या माहितीचे व्यवस्थित रित्या सादरीकरण करावे लागते. तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन ही एक क्रमबध्द प्रक्रिया आहे. तथ्यांच्या पूर्वतयारीत तथ्यांचे संपादन, द्वितीय तथ्यांचे परीक्षण, वर्गीकरण व सारणीकरण इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. त्यानंतर विश्लेषण व निर्वचनाची प्रक्रिया ही क्रमाक्रमाने पार पाडली जाते.

प्रस्तुत संशोधनात माहितीचे सादरीकरण हे तक्ता, विविधा नकाशा पध्दती (पायचार्ट), बारचार्ट याद्वारे तथ्याची मांडणी करण्यात आली. व त्यानुसारच निष्कर्षांची व शिफारशीची मांडणी करण्यात आली आहे. सदर संशोधनातील तथ्यांचे ग्रंथपालांना दिलेल्या प्रश्नावलीच्या व मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातुन संकलन करण्यात आले आहे.

११. संशोधन प्रकरण योजना

संशोधन कार्य हे संपुर्ण व्यवस्थित मांडणी करण्यासाठी त्याचे लिखित स्वरूपात प्रस्तुतीकरण करण्यासाठी सुसंगत अहवाल तयार करणे आवश्यक असते. सदर संशोधन कार्य खालील प्रकरणाच्या माध्यमातून व्यवस्थित मांडणी करण्यात आली आहे.

प्रकरण क्र.१ – प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात 'महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यानयीन ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणाचा अभ्यास.' या विषयावर संशोधन कार्य करीत असताना प्रस्तावना या प्रकरणात संशोधनाचा विषय निवड, संशोधनाची आवश्यकता, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची मर्यादा व व्याप्ती, गृहितके, संशोधन पध्दती, संशोधन तंत्रे, माहिती संकलनाची साधने, माहिती विश्लेषण व सादरीकरण याबाबत सखोल माहिती सादर करण्यात येणार आहे.

प्रकरण क्र. २ - संदर्भ साहित्याचा आढावा

प्रस्तुत प्रकरणात संबधित विषयाच्या अनुशंगाने जागतीक पातळीवर पूर्वी प्रकाशित झालेल्या संशोधनाचा वेगवेगळ्या ग्रंथामध्ये, नियतकालीक, संशोधन प्रबंध, लेख, वृत्तपत्रे, तज्ञांची विविध चर्चा सत्रामध्ये व परिषदामध्ये प्रकाशित लेखाचा आढावा घेण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी ग्रंथालय वाचन साहित्यसंग्रह धोरण याबाबत अत्यंत अल्पप्रमाणात साहित्य प्रकाशित असल्याचे संशोधकास निदर्शनास आले आहे. तरीही प्राप्त स्त्रोताच्या माध्यमाने संशोधकाने संशोधनाशी सबंधीत जी संशोधने आणि संदर्भ साहित्य

अभ्यासले त्याचे विवेचन विस्ताराने करण्यात आले आहे. यामध्ये एकुण ग्रंथ २४, नियतकालिके २९, संशोधन प्रबंध ८, परिषदेतील लेख २, शब्दकोश १, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १ असे एकुण संदर्भसाहित्याच्या आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण क्र.३ - आयुर्वेद महाविद्यालयीन शिक्षण पध्दती व ग्रंथालयांचा वाचनसाहित्यसंग्रह विकास

प्रस्तुत प्रकरणात शिक्षण व शिक्षणाचा अर्थ, स्वरुप भारतातील व महाराष्ट्रातील शिक्षण संदर्भातील शिक्षण, मध्ययुगीन भारतीय शिक्षण, ब्रिटीशकालीन भारतीय शिक्षण, स्वातंत्र्योत्तर भारतीय शिक्षण, आयुर्वेद अर्थ, स्वरुप, व्याप्ती, आयुर्वेद शिक्षण वाढ व विकास, आयुर्वेद शिक्षण त्याचप्रमाणे वाचन साहित्य संग्रह विकास, वाचन साहित्यसंग्रह विकासाचा हेतु, वाचनसाहित्य संग्रह विकासाचे फायदे आदि बाबींवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

प्रकरण क्र.४ – तथ्य विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

“महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांतील वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणाचा अभ्यास.” या विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथपाल उत्तरदात्याद्वारे मुलाखत अनुसुचिच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या माहितीची मांडणी या प्रकरणात करण्यात आलेली आहे.

प्रकरण क्र. ५ – निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनाची दिशा

“महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणाचा अभ्यास” या विषयाच्या

अनुषंगाने संकलित करण्यात आलेल्या माहितीच्या आधारावर प्राप्त तथ्यांच्या विश्लेषणावर आधारित आहे. प्रस्तुत संशोधनासाठी ज्या उद्देशांची, संशोधनाचे गृहितकांची निवड करण्यात आली होती, त्यानुसार तथ्य संकलित करण्यात आलेली आहेत. त्या तथ्यांच्या आधारे काही महत्वपूर्ण निष्कर्ष हे या प्रकरणात मांडण्यात आले आहेत.

१२. संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष

क) ग्रंथालयातील ग्रंथ संग्रहविषयी सर्वसाधारण सद्यस्थिती

१. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयांतील वाचन साहित्य हे ५००० ग्रंथ संख्या असलेल्या महाविद्यालय ग्रंथालयांची ८, ५००१ ते १०००० ग्रंथ संग्रह असलेली ९, १०००१ ते १५००० ग्रंथसंग्रह असलेली २४ (३७.५%), १५००१ ते २०००० ग्रंथसंग्रह असलेली ११ (१७.१९%), २०००१ ते २५००० ग्रंथ संग्रह असलेली ४ (६.२५%), २५००१ ते ३०००० ग्रंथसंग्रह असलेली ६ (९.३८%) तर ३०००१ ते ३५००० ग्रंथसंग्रह असलेली २ (३.१३%) ग्रंथालये आहेत.

यावरुन असे निदर्शनास येते की, सर्वाधिक २४(३७.५%) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयात १०००१ ते १५००० ग्रंथसंख्या होती.

ख) ग्रंथोपार्जन धोरणाविषयी माहिती

१. एकूण ६४ आयुर्वेद ग्रंथालयांपैकी ६३ (९८.४४%) ग्रंथालयांमध्ये ग्रंथोपार्जन धोरणाची आवश्यकता वाटते. तर

१ (१.५६%) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांने कोणताही प्रतिसाद दिला नाही.

सर्वाधिक ग्रंथालयांना ग्रथोपार्जन धोरणाची आवश्यकता आहे असे वाटते.

२. एकूण ४९ (७६.५६%) ग्रंथालयांनी लिखित स्वरुपातील ग्रंथोपार्जन धोरण असावे असा प्रतिसाद दिला. तर १२ (१८.७५%) ग्रंथपालांनी ग्रंथोपार्जन धोरण नसावे, तर ३ (४.६९%) ग्रंथपालांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. सर्वाधिक ग्रंथपालांच्यामते ग्रंथालयाचे ग्रंथोपार्जन लिखित स्वरुपात असावे.

एकुण ४९ (७६.५६%) ग्रंथालयांनी लिखित स्वरुपातील ग्रंथोपार्जन धोरण असावे असल्याचे निदर्शनास आले.

३. एकूण उत्तदात्यांपैकी २३ (३५.९४%) उत्तरदात्यांच्या मते ग्रंथालयांच्या ग्रंथोपार्जन धोरणाचा आढावाही घेणे आवश्यक आहे, १६ (२५.००%) कधीतरी आढावा घेण्यात यावा. २४ (३७.५०%) ग्रंथोपार्जनाचा आढावा हा गरजेनुसार घेण्यात यावा, तर १ (१.५६%) ग्रंथपालांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

सर्वाधिक ग्रंथापालांच्या मते ग्रंथोपार्जन धोरणाच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

४. ग्रंथालयांमध्ये ग्रंथ खरेदी करताना ४६ (७१.८८%) उत्तरदात्याच्यांमते ग्रंथोपार्जन धोरणाचा चांगला उपयोग होतो. तर १३ (२०.३१%) उत्तरदात्याच्यांमते थोडाफार उपयोग होतो. तर ४ (६.२५%) उत्तरदात्याच्यांमते कोणताही उपयोग होत नसल्याचे दिसून आले.

५. ग्रंथालयांने ग्रंथोपार्जन धोरण हे उपयोगात आणल्यास ग्रंथालयांतील ग्रंथ निवड व ग्रंथ खरेदी करताना पारदर्शकता येत असल्याचे ४६ (७१.८८%) उत्तरदात्यांनी सांगितले. तर १३ (२०.३१%) उत्तरदात्याच्यांमते ग्रंथोपार्जन धोरणामुळे ग्रंथालयांमध्ये पारदर्शकता येत नाही. तर ४ (६.२५%) उत्तदात्याच्यांमते काही सांगता येत नाही. असे मत नोंदविले तर १(१.५६%) उत्तरदात्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

ग्रंथोपार्जन धोरणाचा अवलंब केल्यांने ग्रंथ खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता येते असे सर्वाधिक ग्रंथपालांचे मत आहे.

ग) ग्रंथालयातील ग्रंथ खरेदी विषयी माहिती

१. ग्रंथालयांतील ५८ (९०.६३%) ग्रंथ उपलब्धता नियमित तपासली जात असल्याचे निदर्शनास आले, तर ६ (९.३८%) कधीतरी ग्रंथ उपलब्धता तपासली जाते.

सर्वाधिक ५८ (९०.६३%) ग्रंथालयातील ग्रंथांची उपलब्धता तपासली जाते.

२. एकूण ६४ ग्रंथालयापैकी २० (३१.३%) ग्रंथालयात ग्रंथ निवडीसाठी सर्वाधिक प्राधान्य हे ग्रंथालयातील प्राचार्य यांना दिले जात असल्याचे निदर्शनास आले. तर ३६ (५६.२५%) ग्रंथालयात ग्रंथ खरेदी करताना ग्रंथालय समितीला प्राधान्य दिले जाते तर ३२ (५०.००%) महाविद्यालयात ग्रंथ खरेदी करताना प्राध्यापकास प्राधान्य देण्यात येत असल्याचे दिसून आले, त्याचप्रमाणे १८

(२८.१२%) ग्रंथालयात प्राध्यापकास तर ३ (४.६९%) ग्रंथालयात विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येत असल्याचे दिसून आले.

ग्रंथालयामध्ये ग्रंथ निवडीसाठी प्रामुख्याने ग्रंथालय समिती, प्राचार्य, ग्रंथपाल, प्राध्यापक व विद्यार्थींना प्राधान्य देण्यात येत असल्याचे दिसून आले.

३. एकूण ६४ ग्रंथालयापैकी ३१ (८४.४%) ग्रंथालये ग्रंथ खरेदी करण्यासाठी पुरेशी रक्कम देण्यात येत असल्याचे दिसून आले. तर २० (३१.३%) ग्रंथालयात ग्रंथ खरेदी करण्यासाठी पुरेशी रक्कम देत नसल्याचे दिसून आले, तर १३ (२०.३%) महाविद्यालयांतील ग्रंथालयाने याबाबत कोणताही प्रतिसाद दिला नाही.

ग्रंथालयात ग्रंथ खरेदी करण्यासाठी सर्वाधिक ३१ (८४.४%) महाविद्यालयात ग्रंथ खरेदी करण्यासाठी पुरेशी रक्कम देण्यात येत असल्याचे दिसून आले.

४. एकूण ६४ महाविद्यालयांपैकी ४४ (६८.८%) महाविद्यालयांतील ग्रंथालयात मागील वर्षी खरेदी करण्यात आलेली ग्रंथ संख्या ही समाधानकरक असून १४ (२१.९%) महाविद्यालयात ग्रंथसंख्या ही असमाधानकारक असल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे ६ (९.३८%) महाविद्यालयांतील ग्रंथ संख्येबाबत कोणताही प्रतिसाद दिला नाही.

एकूण ६४ महाविद्यालयांपैकी सर्वाधिक विद्यालयांतील ग्रंथालयात मागील वर्षी खरेदी करण्यात आलेली ग्रंथ संख्या ही समाधानकरक असल्याचे दिसून आले.

५. आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयात एकूण ६४ ग्रंथालयांपैकी १० (१५.६३%) ग्रंथालयात नियमित ई-ग्रंथालयांची मागणी होत असल्याचे दिसून आले. तर ३९ (६०.९४%) महाविद्यालयांतील ग्रंथालयात कधीतरी ई-ग्रंथांची मागणी होते तर १५ (२३.४४%) ग्रंथालयात ई-ग्रंथाची मागणी होत नसल्याचे दिसून आले.

आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयात सर्वाधिक कधीतरी ई-ग्रंथांची मागणी होत असल्याचे दिसून येते.

६. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयांपैकी सर्वाधिक म्हणजे ६४ (१००.००%) महाविद्यालयात प्रकाशकांची सूची च्या माध्यमातून ग्रंथ खरेदी करण्यात येत असल्याचे दिसून आले तर ५४ (८४.३८%) महाविद्यालयांमध्ये ग्रंथ विक्रेत्यांनी सुचविलेल्या ग्रंथांची निवड करुन खरेदी करीत असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे १० (१५.६३%) महाविद्यालयांमध्ये ग्रंथ खरेदी करीत असताना प्रकाशकांची सूची व ग्रंथ विक्रेते यांच्या सहाय्याने ग्रंथ निवड करुन ग्रंथ खरेदी करीत असल्याचे आढळले.

आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयात प्रकाशकांच्या सूची च्या माध्यमातून सर्वाधिक ग्रंथ खरेदी करीत असल्याचे दिसून येते.

७. ग्रंथालयांमध्ये सी. सी. आय. एम. व एम. यु. एच. एस. च्या शिफारशी नुसार एकूण ६४ महाविद्यालयांच्या ग्रंथालयांपैकी ५५ (८५.९४%) ग्रंथ उपलब्ध असल्याचे

निदर्शनास आले. तर ९ (१४.०६%) महाविद्यालयीन ग्रंथालयात सी. सी. आय. एम. व एम. यू.एच. एस. च्या शिफारशी नुसार ग्रंथ नसल्याचे निदर्शनास आले.

सर्वाधिक ग्रंथालयात सी. सी. आय. एम. व एम. यु. एच. एस. च्या शिफारशी नुसार ग्रंथ उपलब्धता असल्याचे दिसून आले.

घ) ग्रंथालयातील समिती विषयी माहिती

१. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांमध्ये ग्रंथ निवड समिती ही ५१ (७९.६९%) ग्रंथालयात असून १३ (२०.३१%) महाविद्यालयांमध्ये ग्रंथ निवड समिती नसल्याचे दिसून आले. यावरून असे दिसून येते की, ग्रंथालयांमध्ये ग्रंथ निवड समिती महत्वाची भूमिका बजावते.

२. सर्वाधिक महाविद्यालय ग्रंथालयातील ग्रंथनिवड समिती मध्ये प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल, विद्यार्थी प्रतिनिधी यांचा समावेश असल्याचे आढळले. ३३ (५१.५६%) महाविद्यालयात प्राचार्य, ३४ (५३.१३%) ग्रंथपाल, व ३४ (५३.१३%) शिक्षक प्रतिनिधींचा ग्रंथ निवड समितीमध्ये समावेश असल्याचे आढळून आले. यावरुन असे म्हणता येईल की, ग्रंथालयांतील ग्रंथ निवड समितींमध्ये प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल, विद्यार्थी प्रतिनिधी यांची भूमिका महत्वाची आहे.

३. एकूण ६४ आयुर्वेद ग्रंथालयांपैकी सर्वाधिक २४ (३७.५०%) ग्रंथालयांमध्ये ग्रंथालय समितीची सभा

आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात येत असून एकूण १८ (२८.१३%) ग्रंथालयांमध्ये प्रत्येक ३ महिन्याला व १४ (२१.८८%) ग्रंथालयांमध्ये ६ महिन्याला, त्याचप्रमाणे ८ (१२.५०%) ग्रंथालयांमध्ये १ महिन्याला ग्रंथालय समितीच्या सभा बोलविण्यात येते.

यावरून आयुर्वेद ग्रंथालयांपैकी सर्वाधिक २४ (३७.५०%) ग्रंथालयांमध्ये ग्रंथालय समितीची सभा आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले.

४. एकूण ६४ आयुर्वेद ग्रंथालयांपैकी सर्वाधिक म्हणजे ४४ (६८.७५%) ग्रंथालयामध्ये एकूण निर्णयाच्या जास्तीत जास्त ७५% निर्णयांची अंमलबजावणी करण्यात येत असून १७ (२६.५६%) ग्रंथालयांमध्ये सर्व १००% सभेतील निर्णयांची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे ३ महाविद्यालयांतील ग्रंथालयात केवळ थोड्याफार प्रमाणात म्हणजेच २५% सभेतील निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे संशोधकास निदर्शनास आले.

सर्वाधिक म्हणजे ४४ (६८.७५%) ग्रंथालयामध्ये एकूण निर्णयाच्या जास्तीत जास्त ७५% निर्णयांची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे संशोधकास निदर्शनास आले.

च) ग्रंथालयातील सेवा विषयी माहिती

१. एकूण ६४ ग्रंथालयांपैकी ३२ (५०.००%) ग्रंथालयांमध्ये उपयोजकांच्या गरजेनुसार ई-बुक्स खरेदी करण्यात येत असून १० (१५.६३%) ग्रंथालयांमध्ये नियमितपणे, ११(१७.१९%) ग्रंथालयांमध्ये कधीतरी, ई-बुक्स खरेदी करण्यात येत असून ११ (१७.१९%) ग्रंथालयामध्ये आजपर्यंत ई- बुक्स खरेदी करण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास आले.

सर्वाधिक ग्रंथालयातील वाचकांच्या गरजानुसार ई-बुक्स खरेदी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले.

२. ६४ आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयांच्या उत्तरदात्यांच्या प्राप्त प्रतिसादावरुन असे निदर्शनास येते की, एकूण ग्रंथालयांच्या ४३ (६७.१९%) ग्रंथालयात ई-बुक्स वापरण्याची सोय असल्याचे निदर्शनास आले. तर २१ (३२.८१%) ग्रंथालयात ई-बुक्स वापरण्याची सोय नसल्याचे निदर्शनास आले नाही. यावरुन संशोधनाअंती असे निदर्शनास येते की, बहुसंख्य ग्रंथालयांमध्ये ई-बुक्स वापरण्यासाठीची पुरेशी सोय आहे.

एकुण ४३ (६७.१९%) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयात ई- बुक्स वापरण्याची सोय उपलब्ध असल्याचे दिसुन आले.

३. आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांपैकी ५७ (८९.०६%) हे इलेक्ट्रॉनिक संग्रहाचे वर्गणीदार असून ७ (१०.९४%) इलेक्ट्रॉनिक संग्रहाचे वर्गणीदार नसल्याचे दिसून आले.

यावरुन माहिती तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव हा आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयावर दिसुन येतो.

सर्वाधिक आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक संग्रहाचे वर्गणीदार असल्यांचे संशोधकास निदर्शनास आले.

४. आयुर्वेद महविद्यालयांतील ग्रंथालयांपैकी ३६ (५६.२५%) महविद्यालयातील ग्रंथालये इन्फ्लीबनेट, डेलनेट १८(२८.१३ %), व इतर ६३ (९८.४४%) ग्रंथालयांचे सभासद असल्याचे निदर्शनास आले, तर १० (१५.६३%) ग्रंथालये कोणत्याही नेटवर्कचे सभासद नसल्याचे संशोधकास संशोधनातून निदर्शनास आले.

सर्वाधिक ग्रंथालये ही डेलनेट व इन्फ्लीबनेट नेटवर्कचे सभासद असल्याचे दिसून आले.

छ) ग्रंथालयातील संगणकीकरण विषयी माहिती

१. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयांपैकी २९ (४५.३१%) आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालय परिसरात वाय-फाय सुविधा असुन २९ (४५.३१%) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय परिसरात वाय-फाय सुविधा नसुन ६ (९.३८%) ग्रंथालयांच्या परिसरात वाय-फाय सुविधा देण्याचे विचाराधीन असल्याचे निदर्शनास आले.

२. एकूण ६४ ग्रंथालयांपैकी ४९ (७६.५६%) ग्रंथालयांमध्ये संगणकीकरण असुन १५ (२३.४४%) ग्रंथालयांमध्ये संगणकीकरण नसल्याचे निदर्शनास आले. थोडक्यात असे दिसुन येते की, आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात

ग्रंथालयीन सेवा ह्या संगणकाच्या माध्यमातून देण्यात येत आहे. व सेवा तात्काळ देण्यासाठी संगणकीकृत ग्रंथालय असणे ही आवश्यक असल्याचे दिसते. महाराष्ट्रातील सर्वाधिक आयुर्वेद ग्रंथालय हे संगणकीकृत असल्याचे निदर्शनास येते.

३. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयांपैकी ३७ (५७.८१%) ग्रंथालयात संगणकीकृत देव-घेव करण्यात येते तर २७ (४२.१९%) ग्रंथालयात ग्रंथ देव-घेव ही संगणकीकृत पध्दतीने होत नसल्याचे निदर्शनास आले.

ज) ग्रंथालयातील ग्रंथ रद्दबातल धोरणाविषयी माहिती

१. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांपैकी ४२ (६५.६३%) ग्रंथालयात रद्दबातल धोरण अवलंबविण्यात येत होते तर १२ (१८.७५%) ग्रंथालयात रद्दबातल धोरण अवलंबविण्यात येत नसुन १० (१५.६३%) ग्रंथालयाने या बाबत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद नोंदविला नाही.

आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांमध्ये सर्वाधिक ग्रंथालयात रद्दबातल धोरण अवलंबविण्यात येत असल्याचे दिसून आले.

२. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांपैकी ३२ (५०.००%) आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांमध्ये ग्रंथांची पाने फाटलेली वा खराब झाल्यास ग्रंथालयांमध्ये नियमितपणे रद्दबातल धोरणाचा अवलंब करण्यात येतो. तर २१ (३२.८१%) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांमध्ये ग्रंथाची पाने फाटलेली असल्यास वा ग्रंथ खराब झाल्यास

गरजेनुसार रद्दबातल धोरणाचा अवलंब करण्यात येते. तर ११ (१७.१९%) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांमध्ये ग्रंथाची पाने फाटलेली असल्यास वा ग्रंथ खराब झाल्यास कोणत्याही प्रकारचे धोरणाचा अवलंब करण्यात येत नसल्याचे दिसून आले.

आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांपैकी सर्वाधिक ग्रंथालयांमध्ये ग्रंथांची पाने फाटलेली वा खराब झाल्यास ग्रंथालयांमध्ये नियमितपणे रद्दबातल धोरणाचा अवलंब करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले.

३. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांपैकी ३५(५४.६९%) आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये प्रती वर्षी ग्रंथ परिगणन करीत असुन ११ (१७.१९%) ग्रंथालयात प्रती दोन वर्षांनी ग्रंथ परिगणना केली जाते, १३ (२०.३१%) ग्रंथालयांमध्ये प्रती तीन वर्षानी, तर केवळ ५(७.८१%) ग्रंथालयात ग्रंथ परिगणन करीत असल्याचे निदर्शनास आले.

सर्वाधिक ग्रंथालयात प्रती वर्षी ग्रंथ परिगणना करण्यात येत असल्याचे संशोधकांच्या निदर्शनास आले.

झ) ग्रंथालयातील सेवक धोरणाविषयी माहिती

१. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयांपैकी ५० (७८.१%) ग्रंथालयांत ग्रंथपाल असुन १४ (२१.९%) ग्रंथालयांत ग्रंथपाल नाही, तर ३६ (५६.३%) ग्रंथालयांत सहाय्यक ग्रंथपाल, २८(४३.८%) महाविद्यालय ग्रंथालयांत सहाय्यक ग्रंथपाल नसल्याचे तर २७ (४२.२%) ग्रंथालयांत क्लर्क असुन, ३७ (५७.८%) ग्रंथालयांत ग्रंथालय क्लार्क

नाही, ३९ (६०.९%) ग्रंथालयांत परिचर/ शिपाई असल्याचे तर २५ (३९.९%) ग्रंथालय परिचर/ शिपाई नसल्याचे निदर्शनास आले.

एकूण आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयापैकी १४ ग्रंथालयामध्ये ग्रंथपाल नसल्याचे तर केवळ २८(४३.८%) ग्रंथालयांत सहाय्यक ग्रंथपाल नसल्याचे निदर्शनास आले. यावरून असे निदर्शनास येते की, ग्रंथालयामध्ये वाचकांच्या गरजा पुर्ण करण्यासाठी व विविध सुविधा पुरविण्यासाठी ग्रंथपाल, सहाय्यक ग्रंथपाल, ग्रंथालयातील इतर कर्मचारी असणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

ट) ग्रंथालय वेळे विषयी माहिती

१. आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांपैकी २६ (४०.६३%) सर्वाधिक ग्रंथालय हे सकाळी ९:०० ते सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत सुरु राहत असुन १६ (२५.००%) ग्रंथालये ही सकाळी १०:३० ते सायंकाळी ५:३० सुरू असल्याचे तर ९ (१४.०६%) ग्रंथालये ही सकाळी ९:४५ ते सायंकाळी ५:४५ वाजेपर्यंत सुरू होत असल्याचे निदर्शनास आले.

२. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांपैकी केवळ १० (१०.९४%) ग्रंथालये ही रविवारी सुध्दा सुरु असल्याचे निदर्शनास आले. तर ५७ (८९.०६%) ही सर्वाधिक ग्रंथालय हे रविवारी सुरु नसल्याचे निदर्शनास आले.

ठ) ग्रंथालयाच्या नियतकालीकाविषयी माहिती

१. आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांतील नियतकालिके ही सर्वाधिक ३४ (५३.१%) ग्रंथालये ही स्थानिक पुरवठादारांकडून नियतकालिके खरेदी करीत असुन ३० (४६.९%) ग्रंथालये ही प्रकाशकांकडून नियतकालीकांची खरेदी करीत असल्याचे निदर्शनास आले.

२. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांमध्ये सर्वाधिक ६ ते १० नियतकालिके असलेली ग्रंथालये ही १४ (२१.८८%) आहे. तर सर्वात कमी १ ते ५ नियतकालिके असलेल्या आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालये ६ (९.३८%), सर्वाधिक म्हणजे २६ पेक्षा अधिक नियतकालिके असलेली केवळ ६(९.३८%) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालये निदर्शनास आले, त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारचे नियतकालिके नसलेली १३ (२०.३१%) ग्रंथालये असल्याचे निदर्शनास आले.

ड) ग्रंथालय इमारती विषयी माहिती

१. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांपैकी १७ (२६.५६%) ग्रथालय स्वतंत्र इमारत असलेले, तर ४७ (७३.४४%) आयुर्वेद महाविद्यालयात ग्रंथालये हे महाविद्यालयांच्या इमारतीत असल्याचे दिसुन आले. त्यावरून असे निदर्शनास येते की, एकूण ३६ (५६.२५%) ग्रंथालयास पुरेशी जागा आहे. तर २१ (३२.८१%) ग्रंथालयास पुरेशी जागा नसल्याचे निदर्शनास आले.

त्याचप्रमाणे ७ (१०.९४%) ग्रंथालयांच्या जागेचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे दिसुन आले.

२. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांपैकी केवळ २८ (४३.७५%) महाविद्यालय ग्रंथालयांमध्ये दिव्यांग वाचकांसाठी विविध सुविधा असल्याचे निदर्शनास आले. तर ३६ (५६.२५%) आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयात वाचकांसाठी कोणत्याही सुविधा पुरवित नसल्याचे निदर्शनास आले. दिव्यांग वाचकांसाठी दिल्या जाणा-या विविध सुविधामध्ये रॅम्प सुविधा १७ (२६.६०%), व्हील चेअर ४ (६.२५%), दिव्यांगांसाठी स्वतंत्र विभाग ४ (६.२५%) व दिव्यांगांसाठी स्वतंत्र शौचालय सुविधा ३ (४.६९%) आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयात पुरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले.

ढ) ग्रंथालय अंदाजपत्रकाविषयी माहिती

१. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांपैकी सर्वाधिक ३५ (५४.६९%) ग्रंथालयाना संस्थेद्वारे निधी प्राप्त होत असल्याचे निदर्शनास आले. तर सर्वात कमी ४ (६.२५%) आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांना निधी हा ग्रंथालय सभासद शुल्क व विलंब शुल्कापासून जमा होत असुन, ८ (१२.५०%) महाविद्यालय ग्रंथालयांस निधी हा राज्य शासनाद्वारे व ग्रंथालयामार्फत पुरविण्यात येणा-या सेवाअंतर्गत प्राप्त होत असल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे केवळ ५ (७.८१%) ग्रंथालयास निधी हा केंद्रशासनाद्वारे प्राप्त होतो.

२. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांपैकी ४२ (६५.६३%) ग्रंथपालास ग्रंथालय निधी वापरण्याचा अधिकार नसल्याचे तर केवळ २२ (३४.६८%) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयातील प्राप्त निधी वापरण्याचे अधिकार हे ग्रंथपालास असल्याचे निदर्शनास आले.

३. एकूण ६४ महाविद्यालयीन ग्रंथालयांपैकी केवळ ९ (१४.०६%) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांना प्राप्त होणा-या निधीमध्ये केवळ ५० टक्क्याने वाढ झाल्याचे दिसुन आले. तर ग्रंथालयास प्राप्त होणा-या निधिमध्ये केवळ १० टक्के वाढ झालेले २८ (४३.७५%) ग्रंथालय असुन २० टक्के निधी वाढ झालेले २७ (४२.१९%) महाविद्यालय असल्याचे संशोधकाच्या निदर्शनास आले.

यावरुन असे स्पष्ट होते की, ग्रंथालयास निधी वाटप करीत असताना दरवर्षी प्राप्त होणारा निधीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात येत नसल्याचे दिसून येते. जे की, संशोधन आणि विकासाच्या दृष्टीने अत्यंत कमी असल्याचे निदर्शनास येते.

४. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांस प्राप्त होणा-या अंदाजपत्रक मध्ये केवळ ३३ (५१.५६%) ग्रंथालयांच्या अंदाजपत्रक मध्ये वाढ होत असुन १३ (२०.३१%) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयाचे अंदाजपत्रक हे स्थिर असल्याचे तर १८ (२८.१३%) ग्रंथालयाचे अंदाजपत्रक हे कालमानानुसार कमी होत असल्याचे निदर्शनास आले.

५. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांपैकी १२ (१८.७५%) आयुर्वेद महाविद्यालयांला महाराष्ट्र शासनाचे अनुदान मिळत असल्याचे दिसुन आले, तर २९ (४५.३१%) आयुर्वेद महाविद्यालयांला कोणत्याही प्रकारचे महाराष्ट्र शासनाचे अनुदान मिळत नसल्याचे निदर्शनास आले. त्याप्रमाणे ११ (१७.१९%) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांच्या विकासासाठी कधीतरी किंवा निश्चित असा कालावधी सांगता येत नाही, असा प्रतिसाद दिला. त्याचप्रमाणे १२ (१८.७५%) महाविद्यालय ग्रंथालयांने कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे निदर्शनास आले.

ण) ग्रंथालयीन सुरक्षिततते विषयी माहिती

१. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांपैकी सर्वाधिक ४८ (७५.००%) ग्रंथालयात ग्रंथालय सुरक्षिततेबाबत उपाय योजना करण्यात येत असुन, ४ (६.२५%) आयुर्वेद महाविद्यालयांत कोणत्याही प्रकारच्या उपाय योजना करण्यात येत नाही, तर १२ (१८.७५%) महाविद्यालय ग्रंथालयाने कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे निदर्शनास आले.

२. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांपैकी ४६ (९५.८३%) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयात सी.सी.टी.व्ही. कॅमेरा व्यवस्था असुन ग्रंथ चोरीला जाऊ नये म्हणून आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञान हे केवळ २ (४.१७%) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांत असल्याचे निदर्शनास आले. यावरुन एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालय

ग्रंथालयात ग्रंथ सुरक्षिततेसाठी ४६ (९५.८३%) महाविद्यालय ग्रंथालयामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरा व २ (४.१७%) महाविद्यालय ग्रंथालयांमध्ये आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञान असल्याचे दिसुन आले.

१३.उद्दिष्टांची पूर्तता

प्रस्तुत संशोधन हे ‘‘महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणाचा अभ्यास’’ या संशोधन विषयाच्या अनुषंगाने करण्यात आले आहे. प्रस्तुत संशोधनासाठी ज्या उद्देशांची निवड करण्यात आली होती, त्यानुसार तथ्य संकलित करण्यात आलेली आहेत. त्या तथ्यांचे सादरीकरण हे विविध तक्त्यांच्या व आलेखांच्या आधारे करण्यात आले असुन, त्या तथ्यांच्या आधारे काही महत्वपूर्ण निष्कर्ष काढण्यात आले आहेत. या निष्कर्षांच्या आधारे प्रस्तुत संशोधनासाठी निश्चित करण्यात आलेल्या उद्दिष्टांची पूर्तता कशी होते हे खालील महत्वांच्या मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

उद्दिष्ट क्र. १ महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या सद्यःस्थितीचा आढावा घेणे.

प्रस्तुत संशोधन कार्य करीत असताना संशोधकाने महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयांच्या सद्यःस्थितीचा आढावा घेतला असुन तो आढावा घेत असतांना ग्रंथालयांमध्ये आज किती ग्रंथ संग्रह आहे, कोणकोणत्या सेवा व सुविधा वाचकांसाठी पुरविण्यात येतात, ग्रंथपाल व इतर कर्मचारी आहेत का?, ग्रंथ व्यवस्थापनासाठी कोणते सॉप्टवेअर वापरण्यात येते, कोणकोणते

मासिके सुरू करण्यात आले आहेत व त्यांचा दर्जा कोणत्या प्रकारचा आहे? इत्यादी सर्व बाबी संशोधकांने अभ्यासण्याचा प्रयत्न केला. म्हणजेच ग्रंथालयांची एकंदरीत सद्यःस्थिती कशी आहे?, याचा आढावा घेण्यात आला. त्यामुळे सदर संशोधनातुन हे आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयांच्या सद्यःस्थितीचा आढावा घेण्याचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याचे दिसुन येते.

उद्दिष्ट क्र. २ आयुर्वेद शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे

संशोधकांने संशोधन कार्य करीत असताना भारतातील आयुर्वेद शिक्षण पध्दतीचा ऐतिहासीक आढावा घेऊन त्यामध्ये आजपर्यंत जे शिक्षण देण्यात येत आहे, आयुर्वेद शिक्षण पध्दतीची वाढ व विकास त्याचप्रमाणे भारतामध्ये आयुर्वेद शिक्षण देणा-या प्रमुख संस्थांचाही आढावा संशोधकाने घेतला आहे. त्यामुळे हे संशोधन आयुर्वेद महाविद्यालयातील शिक्षण पध्दती, वाढ, विकास, प्रमुख संस्थांचा अभ्यास करणे, या उद्दिष्टानुरूप असल्याचे निदर्शनास येते.

उद्दिष्ट क्र. ३ आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील मुद्रित व अमुद्रित वाचनसाहित्य संग्रह विकासाचा अभ्यास करणे.

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने सदर संशोधन हे महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांतील मुद्रित व अमुद्रित वाचनसाहित्य संग्रह विकासाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीकोनातून ग्रंथालयांमध्ये कोणत्या प्रकारचे मुद्रित व अमुद्रित साहित्य उपलब्ध आहे. त्यामुळे वाचनसाहित्य संग्रहाचा कसा विकास झाला यावरही प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे सदर संशोधन हे उद्दिष्ट क्र. ३ नुसार झाल्याचे निदर्शनास येते.

उद्दिष्ट क्र. ४ आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या वाचनसाहित्यसंग्रह विकासासाठी उपलब्ध असणा-या धोरणाचा अभ्यास करणे.

वाचनसाहित्यसंग्रह ही ग्रंथालय व्यवस्थापनातील महत्वपूर्ण प्रक्रिया आहे. ग्रंथालयांमध्ये वाचन साहित्य संग्रहाच्या माध्यमातून वाचकांच्या अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाची गरज पूर्ण करण्यासाठी आणि वाचन साहित्याची निवड, संग्रह, दाखल नोंदी व साहित्याचे मूल्यमापन ही वाचकांच्या माध्यमातून केले जाते. त्यामुळे वाचकांच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यासाठी वाचकांच्या गरजा आणि ग्रंथालयातील साहित्य संग्रह यामध्ये ताळमेळ साधने आवश्यक ठरते. त्यासाठी वाचकांनी ग्रंथालय ज्या उद्देशाने स्थापित झालेले असते. त्यांच्या गरजा पुर्ण करण्यासाठी वाचकांनी सुचविलेल्या सूचना वा शिफारशी यांची ग्रंथसंग्रह करीत असताना विचारात घेणे आवश्यक असते. ग्रंथसंग्रह किंवा संकलन ही ग्रंथालय संग्रहातील व ग्रंथालय व्यवस्थापन ही ग्रंथालयातील लक्षणीय सर्वात समस्याप्रधान कार्य आहे. त्यामुळे ग्रंथ संकलन विकासाचे नियोजन करित असताना, त्याबाबत निर्णय घेणे किंवा अंदाजपत्र तयार करीत असताना त्याबाबत व्यवस्थित मांडणी करणे आवश्यक असते, ग्रंथालय विकासासाठी ग्रंथसंग्रह धोरणाची आवश्यकता लक्षात घेता, प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने संशोधन कार्य करण्यासाठी, ग्रंथालय उद्दिष्ट्ये पूर्णत्वास नेण्यासाठी ग्रंथालयाची भूमिका लक्षात घेता ग्रंथसंग्रह विकास करण्यासाठी विशिष्ट धोरण असणे आवश्यक आहे. या सर्व बाबी लक्षात घेल्या. संशोधकाने प्रस्तुत उद्दिष्टानुसार म्हणजेच महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या

वाचनसाहित्यसंग्रह विकासासाठी उपलब्ध असणा-या धोरणाचा अभ्यास करणे या उद्दिष्टाची पूर्तता होत असल्याचे निदर्शनास येते.

उद्दिष्ट क्र. ५ महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या वाचनसाहित्यसंग्रह विकासात ग्रंथालय समितीची भूमिका जाणून घेणे.

ग्रंथालयांमध्ये काही वैधानिक व कायदेशीर सल्ला देण्यासाठी काही समित्या असतात. या समितींच्या माध्यमातून विशिष्ट नवीन कार्यक्रम, नवीन सेवा, प्रकल्प, ग्रंथालयांतील प्रश्न यासारख्या अनेक बाबींवर विचार केला जातो. एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयांमध्ये ग्रंथ निवड समिती ही ५१(७९.६९%) महाविद्यालयातील ग्रंथालयांत असल्याचे आढळुन आले.

यावरून असे दिसून येते की, ग्रंथालयांमध्ये ग्रंथ निवड समितीची महत्वाची भूमिका बघता सर्वाधिक ग्रंथालयांमध्ये ग्रंथ निवड समिती आहे. त्यामुळे त्या ग्रंथालयांमध्ये ग्रंथ निवड करीत असताना अभ्यासक्रमाशी उपयुक्त ग्रंथाचे व इतर ग्रंथाची संख्याही अधिक व उपयुक्त ग्रंथ असल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच सर्वाधिक ग्रंथालयात ग्रंथ निवड समिती असल्याचे आढळून आले. ग्रंथालयामध्ये ग्रंथालय विकासासाठी व ग्रंथालयाच्या प्रगतीसाठी ग्रंथालय समितीची भूमिका महत्वपूर्ण आहे.

थोडक्यात संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी निश्चित करण्यात आलेल्या सर्व उद्दिष्टानुसार संशोधन कार्य करण्यात आल्याचे निदर्शनास येते.

१४. गृहितकांची पडताळणी

संशोधकाने प्रस्तुत संशोधनाला अनुसरुन जी उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली होती. त्या उद्दिष्टांना अनुसरुन काही गृहितके ही संशोधन कार्य करण्यासाठी निश्चित करण्यात आली होती. त्या गृहितकांची पडताळणी करणे संशोधनाचा महत्वपूर्ण भाग असतो. त्या अनुषंगाने संशोधकाद्वारे संशोधनात काही प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. त्या माध्यमातून काही माहिती संकलित करण्यात आली होती. त्या माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण करण्यात आले आहे. संशोधन कार्याला योग्य दिशा व मार्ग मिळावा म्हणून संशोधन संमस्ये संदर्भात योग्य उत्तर मिळवण्यासाठी संशोधनांमध्ये संशोधन साहित्याच्या आधारे काही गृहितकांची मांडणी केली होती. त्यांची सत्यता पडताळणी संशोधनाअंती करणे आवश्यक ठरते, त्या दृष्टिकोनातून संशोधनासाठी मांडलेल्या गृहितकांची पडताळणी खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

गृहितक क्र. १ महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या सद्यःस्थिती समाधानकारक आहे.

प्रस्तुत संशोधन कार्य करीत असताना सशोधकाने महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयांच्या सद्यःस्थितीचा आढावा घेतला, तो आढावा घेत असतांना ग्रंथालयांमध्ये आज किती ग्रंथ संग्रह आहे, कोणकोणत्या सेवा व सुविधा वाचकांसाठी पुरविण्यात येतात, ग्रंथपाल व इतर कर्मचारी आहेत का?, ग्रंथ व्यवस्थापनासाठी कोणते सॉप्टवेअर वापरण्यात येते, कोणकोणती मासिके सुरू करण्यात आलेली आहेत व त्यांचा दर्जा कोणत्या

प्रकारचा आहे इ. सर्व बाबी अभ्यासण्याचा प्रयत्न केला म्हणजेच ग्रंथालयाची एकंदरीत सद्यःस्थिती कशी आहे याचा आढावा घेतलेला आहे. त्यामुळे सदर संशोधन हे आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयांच्या सद्यःस्थितीचा आढावा घेण्याच्या उद्देशांने अनेक बाबींवर आधारित माहिती मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून घेण्यात आला आहे. त्यामध्ये तक्ता क्र. ४.२ वरूण असे निदर्शनास येते की, सर्वच ग्रंथालयात ५००० ते ३५००० ग्रंथ संख्या असलेली दिसून येते म्हणजे आज उपलब्ध असलेला ग्रंथसंग्रहाबाबत ग्रंथालये समृध्द आहेत, तक्ता क्र. ४.५ वरून सर्वाधिक ग्रंथालयात ग्रंथोपार्जन हे त्या त्या ग्रंथालयाच्या धोरणानूसार नियमितपणे होत असल्याचे निदर्शनास येते एकंदरित ग्रंथालयांच्या ग्रंथोपार्जनाची स्थिती समाधानकारक असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे ग्रंथालयांतील व्यवस्थापनासाठी सॉफ्टवेअर, सर्वाधिक ग्रंथालयात ३७ (५७.८१%) सॉफटवेअर असल्याचे तर ग्रंथालयांच्या माध्यमातून देण्यात येणा-या सेवा व सुविधा, ग्रंथ खरेदी करताना वाचक, प्रध्यापक, प्राचार्य आणि ग्रंथपाल इत्यादींचा असलेला सहभाग त्यासाठी पूरेसा निधी, ग्रंथ संख्येबाबत समाधान, ग्रंथ खरेदीचे माध्यमे, ग्रंथ खरेदी करताना कोणत्या बाबी लक्षता घेतल्या जातात याबाबत माहिती, ग्रंथ खरेदी करताना CCIM व MUHS च्या शिफारशी नुसार ग्रंथ खेरदी करण्यात येतात का? इत्यांती बाबींची माहिती संकलित करण्यात आली. तक्ता क्र. ४.२५ नुसार ५५ (८५.९४%) महाविद्यालयात ग्रंथ खरेदी करतांना CCIM व MUHS च्या शिफारशी नुसार करीत असल्याचे निदर्शनास आले. यावरुन "महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या सद्यःस्थिती समाधानकारक" असल्याचे

निदर्शनास येते, यावरुन हे गृहितक सिध्द झाले असुन त्यामुळे हे गृहितक स्विकारण्यात आले आहे.

गृहितक क्र. २ आयुर्वेद शिक्षणाची सुरुवात प्राचीन काळापासून झालेली असून त्यामध्ये झपाट्याने विकास झाल्याचे दिसून येते.

प्रस्तूत संशोधन करीत असताना असे निदर्शनास येते की, आयुर्वेदाला पाचवा वेद असल्याचे संभोधण्यात येते. प्राचिन काळापासून आयुर्वेद शिक्षणाला महत्व असल्याचे दिसून येते. चरक संहिता व सुश्रृत संहितेतही आयुर्वेदाला महत्वाचा उल्लेख आढळतो. सातव्या/ आठव्या शतकातही आयुर्वेदाला रसशास्त्र किंवा रसतंत्र याबाबत माहिती आढळते. स्वातंत्र्यपुर्व काळामध्ये लोकमान्य टिळकाचा स्वदेशी चळवळीचा परिणाम म्हणून भारतात देशी शास्त्र चिकित्सा पध्दतीला चालना मिळाली. १९२० मध्ये नागपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेसने भारतीय देशी चिकित्सा पध्दतीला प्रोत्साहन देण्याविषयीचा ठराव मंजूर केला. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये आयुर्वेदाच्या विकासासाठी विविध समित्या स्थापन झाल्याचे दिसून येते. त्यामध्ये १९२१ मध्ये मद्रास, बंगाल येथे १९२५, उत्तरप्रदेश मध्ये १९२८, पंजाब मध्ये १९३८ १९४० मध्ये मुंबई १९४७ मध्ये आसाम येथे विविध प्रांतीय समित्या स्थापन झाल्याचे निदर्शनास येते. त्यामध्ये प्रामुख्याने खालील शिफारसी केल्याचे दिसून येते.

देशी चिकित्सा पध्दतीला राजमान्यता देण्यात यावी, देशी चिकित्सा पध्दतीतील पदवीधरांची राष्ट्रीय नोंदणी करण्याची सोय

करावी. यासाठी निबंधकाची नियुक्ती करावी, आयुर्वेद व अन्य देशी चिकित्सा पध्दतीची महाविद्यालये सुरु करावीत.

आयुर्वेद व देशी चिकित्सा पध्दतीची रुग्णालये उघडावीत या शिफारशीनुसार १९३८ मध्ये आयुर्वेद वैद्यांच्या नोंदणीची सोय करण्यात आली. या करिता भारतीय चिकित्सा बोर्ड व स्टेट कॉन्सिलची स्थापना करण्यात आली. देशी चिकित्सा पध्दतीची महाविद्यालये व रुग्णालये सुरु करण्यात आली. भोर समिती (१९४५), चोपडा समिती (१९४६), पंडीत समिती (१९५२), दवे समिती (१९५४), उडुप समिती (१९५८), मुदलियर आयोग (१९५९), व्यास समिती (१९६२), सन १९७० केंद्र सरकारने एक अध्यादेश काढून बी. ए. एम. एस. या अभ्यासक्रमास सुरुवात, सेंट्रल कॉन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन, नवी दिल्ली (१९७१) व सन २०२० मध्ये भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग (NCISM) ची स्थापना करून आयुर्वेद शिक्षणाला चालणा देण्यात येत असल्याचे दिसून येते. यावरून आयुर्वेद शिक्षणाची सुरुवात प्राचीन काळापासून झालेली असून त्यामध्ये स्वतंत्र्य प्राप्तीनंतर अनेक समित्या स्थापन करुन आयुर्वेद शिक्षण पध्दतीचा झपाट्याने विकास झाल्याचे दिसून येते, त्यामुळे हे गृहितक स्वीकारण्यात आल्याचे निदर्शनास येते.

गृहितक क्र. ३ महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील अमुद्रित (Non Print Materials) वाचनसाहित्य संग्रह विकास धोरण लिखित स्वरुपात करण्याची आवश्यकता आहे.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयांनी मुद्रित व अमुद्रित ग्रंथ संग्रह ठेवणे आवश्यक आहे. व त्याबाबत निश्चित स्वपरुपातील धोरण ठरविणे आवश्यक आहे. एकुण आयुष मंत्रालय, भारत सरकार व महाराष्ट्र शासन संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन विभाग महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या सर्व उच्च स्थरिय आयुर्वेद शिक्षण व सर्व शाखातील आरोग्य विज्ञान शाखातील महाविद्यालयीन ग्रंथालयांसाठी कोणत्याप्रकारचे मुद्रित व अमुद्रित ग्रंथ संग्रह विकासासाठी धोरणे नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील अमुद्रित (Non Print Materials) एकुण ६३ (९८.४४%) उत्तरदात्यांच्या मतानुसार वाचनसाहित्य संग्रह विकास धोरण लिखित स्वरुपात करण्याची आवश्यकता आसल्याचे संशोधकास निदर्शनास आले. तर एकूण ४९ (७६.५६%) उत्तरदात्यामते त्यांच्या ग्रंथालयाचे ग्रंथोपार्जन धोरण हे लिखित स्वरुपात केल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे तक्ता क्र. ४.५ वरुन असे निदर्शनास येते की, एकूण २३ (३५.९४%) ग्रंथालयामध्ये नियमितपणे ग्रंथालय धोरणाचा आढावा घेण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. यावरुन प्रस्तूत संशोधनासाठी निश्चित करण्यात आलेले ग्रृहितक क्रं ३ हे स्विकारण्यात आले असल्याचे निदर्शनास येते.

गृहितक क्र. ४ महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रह विकास धोरणामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये ग्रंथसंग्रह विकासाबाबत अध्ययन करीत असतांना आयुष मंत्रालय, भारत सरकार, भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग अंतर्गत भारतातील सर्व राज्यातील आयुर्वेद महाविद्यालय व इतर शाखातील आरोग्य विज्ञान महाविद्यालयांसाठी कोणत्याही प्रकारची ग्रंथालयीन वाचन साहित्यसंग्रहाचा विकास करण्याच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शक तत्वे, सूचना व वाचनसाहित्यसंग्रह धोरण उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. तसेच महाराष्ट्र शासनाच्या, संचालनालय, मंत्रालय वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठाशी संलग्न असणा-या सर्व महाविद्यालयांना प्रश्नावली देण्यात येत असताना उत्तरदात्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे असे लक्षात येते की, सद्यःस्थितीत कोणत्याही प्रकारचे धोरण, सूचना व वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरण लिखित स्वरुपात नाही.

यावरून महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांतील वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरण लिखित स्वरुपात तयार करण्याची आवश्यकता आहे, हे सिध्द झाले आहे.

गृहितक क्र. ५ महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालय वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणात ग्रंथालय समितीची महत्वपूर्ण भूमिका दिसून येते.

ग्रंथालयांमध्ये काही वैधानिक व कायदेशीर सल्ला देण्यासाठी व ग्रंथपालाला ग्रंथालयाबाबत महत्वपूर्ण बाबींवर निर्णय घेण्यासाठी

काही समित्या ह्या असतात. या समितीच्या माध्यमातून विशिष्ट, नवीन कार्यक्रम नवीन सेवा, प्रकल्प, ग्रंथालयातील प्रश्न यासारख्या अनेक बाबींवर विचार करण्यासाठी सल्ला घेण्यासाठी विविध समित्या ग्रंथालयामध्ये कार्यरत असतात.

प्रस्तुत संशोधन करीत असतांना महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांचे अध्ययन करीत असताना, तक्ता क्र. ४.२६ वरुन एकूण ६४ आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयापैकी ५१ (७९.६९%) ग्रंथालयात ग्रंथ निवड समिती असुन, तक्ता क्र. ४.२७ वरुन ग्रंथालयातील ग्रंथ निवड समितीतील सभासदामध्ये प्राचार्य ३३ (५१.५६%), ग्रंथपाल ३४ (५३.१३%), शिक्षक प्रतिनिधी ३४(५३.१३%), सभासद असल्याचे निदर्शनास आले. तक्ता क्र. ४.२९ वरुन ग्रंथालय समितीच्या सभांचे आवश्यकतेनुसार सर्वाधिक २४(३७.५०%) महाविद्यालयामध्ये आयोजन करण्यात येत असल्याचे तर १८ (२८.१३%) महाविद्यालय ग्रंथालयामध्ये त्रैमासिक सभांचे आयोजन तर प्रत्येक वर्षातुन दोन सभा १४ (२१.८८%) महाविद्यालय ग्रंथालयात आयोजित करीत असल्याचे आढळून आले. आणि तक्ता क्र. ४.३० वरुन असे निदर्शनास येते की, ४४ (६८.७५%) ग्रंथालयामध्ये ७५% पेक्षा अधिक ग्रंथालय समितीचे निर्णय किंवा ठरावाची अमलबजावणी होते.

यावरुन महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालय वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणात ग्रंथालय समितीची महत्वपूर्ण भूमिका आहे, हे गृहितक स्विकारण्यात आले असल्याचे निदर्शनास येते.

१५. शिफारशी

संशोधकाला संशोधन कार्य करीत असताना व संकलित माहितीच्या आधारे जे निष्कर्ष विश्लेषणाद्वारे प्राप्त झाले त्यांचे संकलन करित असतांना संशोधकाला काही शिफारशी कराव्यात असे वाटले. संशोधकाला संशोधन प्रबंध तयार करण्याकरिता निवडलेल्या संशोधन विषय "महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणाचा अभ्यास." हा होता. त्या विषयाला अनूसरून ग्रंथालयातून दिल्या जाणा-या विविध सेवा व सुविधांचा त्याचप्रमाणे ग्रंथसंग्रहविकास धोरणा बाबत आढावा घेण्यात आला होता. त्यावरून असे निदर्शनास आले की, ग्रंथालय कोणतेही असो त्या ग्रंथालयाच्या माध्यमातून ग्रंथालयाचे किंवा ग्रंथालयाच्या प्रमुख शाखेचे निश्चित असलेले धेय व धोरणे पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून उत्कृष्ट व गुणवत्तापूर्ण सेवा व सुविधा देत असताना योग्य तो ग्रंथसंग्रह करीत असताना ग्रंथ विकास धोरणाचा अवलंब करणे आवश्यक असते. त्यासाठी ग्रंथ विकास धोरण ठरविणे गरजेचे असते. त्या दृष्टिकोनातून काही प्रमुख शिफारशी ह्या संशोधकाने केल्या आहेत त्या खालील प्रमाणे होत.

१. आयुर्वेद महाविद्यालय व वैद्यकीय शाखेतील सर्व महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या वाचनसाहित्यसंग्रह विकास करीत असतांना मुद्रीत व अमुद्रीत वाचन साहित्यसंग्रहाचे धोरण लिखीत स्वरुपात करणे आवश्यक आहे.

२. आयुर्वेद महाविद्यालय व वैद्यकीय शाखेतील सर्व महाविद्यालयातील ग्रंथालयाचा वाचनसाहित्यसंग्रह विकास होण्यासाठी शासन, विद्यापीठ व महाविद्यालयीन व्यवस्थापन

यांनी वेळोवेळी वाचनसाहित्य संग्रहासाठी आर्थिक नियोजन करणे आवश्यक आहे.

३. महाविद्यालयांतील ग्रंथालयांच्या माध्यमातून पात्रताधारक व त्या शैक्षणिक अभ्यासक्रमास उपयुक्त असलेल्या ग्रंथपालांची नियुक्ती करावी.

४. आयुर्वेद महाविद्यालये असल्यामुळे आयुर्वेद क्षेत्रामध्ये नियमित नव-नवीन शोध लावले जात असतात. त्यामुळे त्या शोधांची माहिती त्या क्षेत्रातील शिक्षण घेणा-या विद्यार्थी व शिक्षकांना त्याचप्रमाणे वेगवेगळ्या डॉक्टरांना होण्यासाठी ग्रंथालयांच्या माध्यमातून प्रचलित जागरूक सेवा व निवडक माहिती प्रसारण सेवा अद्ययावतपणे सुरु कराव्यात.

५. आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. त्यामुळे ग्रंथालयांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा, इंटरनेट सुविधेसह संगणकाचा सर्वाधिक वापर करण्यासाठी अत्याधुनिक संगणक कक्ष सुरू करावेत.

६. आयुर्वेद क्षेत्र हे अतिशय महत्व पूर्ण क्षेत्र असल्यामुळे आयुर्वेद प्रशिक्षण देणा-या महाविद्यालयातील ग्रंथ संग्रह विद्यार्थी संख्येनुसार ग्रंथ खरेदी दरवर्षीप्रमाणे करण्यात यावी.

७. ग्रंथालयाची स्वतंत्र जागा किंवा इमारत ही महाविद्यालयांच्या मध्यवर्ती ठिकाणी असावी.

८. ग्रंथालयातील वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालिके यांचे प्रमाण अधिक व नियमितपणे येणारे असावे.

९. ग्रंथालयातच ग्रंथालयांतील ग्रंथसंग्रहाची देवघेव करण्याप्रमाणे सुसज्ज व सर्व सुविधायुक्त असे वाचन कक्ष असावेत.

१०. ग्रंथालयातील वाचकांच्या माहितीविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी व त्यांना उपयुक्त असेच ग्रंथसंग्रह ग्रंथालयामध्ये मोठ्या प्रमाणावर असावेत.

११. ग्रंथालयातील वाचकांच्या माहितीविषयक गरजा जाणून घेवुन नियमित वाचकांचा अभ्यास करणे अवश्यक आहे.

१२. ग्रंथालयांनी विविध कंसोर्शीयांचा किंवा डेटाबेस यांचे सभासदत्व स्वीकारणे आवश्यक आहे.

१६. पुढील संशोधनासाठी दिशा

संशोधकास संशोधन कार्य करीत असतांना असे लक्षात आले की, केवळ आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या माध्यमातून वाचनसाहित्यसंग्रह करीत असतांना किंवा ज्या सेवा व सुविधा पुरविल्या जातात त्याबाबत आवश्यक माहिती पुरविण्यासाठी ग्रंथालयाने वाचन संग्रह धोरण ठरविणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे ग्रंथालयांची इतर अनेक क्षेत्र आहेत. त्या क्षेत्रांचाही अभ्यास होणे आवश्यक आहे. ते खालील प्रमाणे होत.

१. महाराष्ट्रातील वैद्यकीय महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा वाचन साहित्य संग्रह : एक अभ्यास

२. आयुर्वेद महाविद्यालये व वैद्यकीय महाविद्यालये यांच्या वाचनसाहित्यसंग्रह धोरणाचा तुलनात्मक अभ्यास.

३. आयुर्वेद महाविद्यालयातील मुद्रित व अमुद्रित वाचनसाहित्य :एक अध्ययन

४. आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे व्यवस्थापन करण्यासाठी सॉफ्टवेअरचा वापर : एक अभ्यास

५. आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या सेवा व सुविधांचा चिकित्सक अभ्यास

अशाप्रकारे वरील प्रमाणे एखाद्या विषयावर सदर संशोधनास अनुसरून असलेल्या विषयाचे अध्ययन करता येईल.

१७. समारोप

सदरील संशोधन हे "महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणाचा अभ्यास." यावर करण्यात आले आहे. प्रस्तुत संशोधनात ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रह विकास धोरणाची अमलबजावणी ग्रंथालयाच्या माध्यमातुन राबविण्यात येण्याबाबत करण्यात आले असुन त्याबाबत माहिती ही प्रश्नावलीच्या माध्यमातून संकलीत करण्यात आली असुन आलेल्या माहितीचे अर्थनिर्वन करुन प्राप्त निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. व गृहितकांची पडताळणी करण्यात आली असुन महत्वाच्या शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत व पुढिल संशोधन कार्यासाठी दिशा दर्शविण्यात आली आहे.

१८.संदर्भसूची

१. आयुर्वेद, (२०१३). आयुर्वेद. भारतीय संस्कृतीचा कोष भाग १. पृ.क्र. ४२१.

२. आगलावे, प्रदीप. (२०००). संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे. नागपूर, विद्या प्रकाशन. पृ. क्र. १५०-१७५.

३. क-हाडे, बी. एम. (२०११). शास्त्रीय संशोधन पध्दती. नागपुर, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स. पृ. क्र. ६४-७१.

४. भांडारकर, पु. ल. (१९८७). सामाजिक संशोधन पध्दती. नागपुर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ. पृ. क्र. २१४-२१६.

५. निकोसे, सत्यप्रकाश. (२००७). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती. नागपुर, प्रज्ञा प्रकाशन. पृ. क्र. ९८-११२.

६. परांजपे, गो. रा. (१९८५) आयुर्वेदाचा इतिहास व परिचय. अनमोल प्रकाशन आवृती -२ पुणे. पृ. क्र. ६८-७५

७. फडके, द. ना (२००५). ग्रंथेत्तर साहित्याचे व्यवस्थापन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठ, नाशिक. पृ. क्र. ४६१.

८. देवधर, विजय, (२०१०). ग्रंथालय व माहितीशास्त्र परिभाषा कोष, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे. पृ. क्र. ६८-७५.

९. क्षीसागर, शकुंतला. (२०१२). प्रबंधलेखनाची पध्दती, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे. पृ. क्र. ६१-७६.

१०. करमरकर, प्रकाश. (२०१८). ग्रंथालयील संदर्भ सेवा, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे. पृ. क्र. ३९-६०.

११. पाटील, प्रदिप आणि पाटील, कल्पना, (२०१९). ग्रंथालय संगणकीकरण, प्रशांत पब्लिकेशल, जळगाव. पृ.क्र. ३२-८१.

१२. बुवा, जी. ए. (२००७). ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापनाचे नवे प्रवाह, श्री साई प्रकाशन, सावंतवाडी. पृ. क्र. ५१-७४.

१३. Britannica, (2023). Library, Retrieved from https://www.britannica. com/topic/library, Accessed on 15 August 2023.

१४. Gopinath, M. A. and Rao, I. K. R., (1982). Collection Development and Users: an analytical approach. DRTC Annual Seminar (19).

१५. Kaur, R. and Gaur, R. (2017). Collection Development In Academic Libraries With Special Reference To Digital Era. *International Journal of Digital Library Services,* Vol. 7(2), 107-114.

१६. Khayal, R. (2013). Collection Development and Services in Law Libraries in Delhi A Comparative Study. Retrieved from: http://hdl.handle. net/10603/138842.

१७. Kumar, S. and Gaur, R. C. (2018). Collection Development and Management in Libraries of Management Institutions, *International Journal of Librarianship and Administration*, Vol. 9(1). pp. 1-8.

१८. Maharashtra Government (2017) The Maharashtra Public Universities Act, 2016, Maharashtra Government Gazette, 11th January 2017.

१९. Patel, S. (2016). Collection development in academic libraries. *International Journal of*

Library and Information Science, Vol. 8(7), pp. 62-67.

२०. Wikipedia. (2025). College Library. Wikipedia, retrived from on https://en.wikipedia.org/wiki/Academic_library, accessed on 19 June, 2025.

संशोधक
संदीप उत्तम चोपडे

मार्गदर्शक
डॉ. रसिका आर. वडाळकर
ग्रंथपाल, सहाय्यक प्राध्यापक
डॉ. जी. वाय. पाथ्रीकर कॉलेज
ऑफ कॉम्पुटर सायन्स ॲण्ड
इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी,
ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग,
एम. जी. एम. विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र.